# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१५/ ३१२१

दिनांक : - 6 NOV 2015

प्रति,
संचालक /प्राचार्य
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
अभियांत्रिकी पदवी /औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालये.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ईबीसी व SGS Minority फॉर्म्स सादर करणेबाबत**

सर्व खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत पदव्युत्तर पदवी, पदवी पदविका संस्थांना कळविण्यांत येते की, या कार्यालयाने संदर्भीय कार्यशाळेमध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार व तद्नंतर या कार्यालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकांनुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतीपुर्तीबाबतचे ऑफलाईन अर्जांचे प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदर कामकाज सुलभपणे पार पाडण्यासाठी आपल्या संस्थेचा आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतीपूर्तीबाबतचा प्रस्ताव तसेच SGS Minority Forms खाली नमूद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सादर करावेत.

ज्या संस्थांमध्ये एकापेक्षा जास्त अभ्यासक्रम शिकविले जातात अशा संस्थांनी खालील वेळापत्रकामध्ये जरी वेगवेगळ्या दिवशी त्यांचे कोड नमूद केले असतील तरी त्यांनी खालील तारखांपैकी कोणत्याही एका तारखेस त्यांचे सर्व अभ्यासक्रमांचे प्रस्ताव सादर करावेत.

| अ. क्र. | प्रस्ताव सादर करावयाच्या संस्थांचे डीटीई कोड क्रमांक | प्रस्ताव सादर करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | ३००२ ते ३१०९ | दि. १६/११/२०१५ |
| २ | ३११० ते ३१७३ | दि. १७/११/२०१५ |
| ३ | ३१७४ ते ३२१० | दि. १८/११/२०१५ |
| ४ | ३२११ ते ३२५७ | दि. १९/११/२०१५ |
| ५ | ३२५८ ते ३३५५ | दि. २०/११/२०१५ |
| ६ | ३३५८ ते ३४८०, डी-३१८७, एमएच-१३८७, एमएच-१५४७, एमएच-१५४८ | दि. २१/११/२०१५ |

ईबीसी प्रतिपूर्तीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यांत येते की, त्यांनी प्रस्ताव सादर करण्याच्या अगोदर सर्व ईबीसी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क नमूद करताना विद्यार्थ्याने ज्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला असेल त्या शैक्षणिक वर्षाचे शुल्क व शिक्षण शुल्क समितीच्या प्रचलित नियमानुसार दर वर्षी जी वाढ संस्था करते ते शुल्क असे मिळून शुल्क नमूद करावे. शिक्षण शुल्क समितीने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चे शुल्क मंजूर केलेले नसेल तर गतवर्षीचे शुल्क गृहीत धरुन शुल्क नमूद करावे व तद्नंतर सदर विद्यार्थ्यांचे ऑफलाईन विवरणपत्र २ प्रतींमध्ये प्राचार्य/संचालकांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडावे. सदर विवरणपत्राची ऑफलाईन प्रिंट आऊट काढण्याच्या अगोदर सदर **Excel Sheet**च्या विवरणपत्रातील शेवटचा रकाना रिमार्क/शेरा मारण्यासाठी ठेवावा. जेणेकरुन या कार्यालयाच्या छाननी पथकाला त्रुटी नमूद करणे सोयीचे होईल.

**SGS Minority चे फॉर्म्स सादर करण्यापूर्वी सदर अर्जांची ऑनलाईन यादी Scan करुन Upload केली आहे की नाही, याची खात्री करुन घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत अर्जांची ऑनलाईन यादी अपलोड न करता Minority चे फॉर्म्स सादर करण्यांस येऊ नये.**

<u>**प्रस्ताव सादर करतांना प्रत्येक ऑफलाईन अर्ज खालीलप्रमाणे जोडण्यांत यावा.**</u>

१. ऑफलाईन अर्ज (अर्जाच्या शेवटी विद्यार्थी व विद्यार्थ्याच्या पालकाची स्वाक्षरी व त्याखाली प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी अनिवार्य आहे.)
२. डोमिसाईल सर्टिफिकेट किंवा लिव्हींग सर्टीफिकेट (दोन्ही सर्टिफिकेट्स उपलब्ध नसतील तरच जन्म दाखला)
३. मागिल वर्षाच्या गुणपत्रिका (विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेवर FAIL असे नमूद केलेले असल्यास पुढील वर्षात प्रवेशासाठी पात्र असल्याबाबतचे प्राचार्यांचे साक्षांकन [Attestation] असणे अनिवार्य आहे.)
४. रेशनकार्डची छायांकीत प्रत
५. गॅप असल्यास मूळ प्रतिज्ञापत्राची नोटरी असलेली प्रत (Original affidavit should be submit)
६. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ची शुल्क जमा पावती
७. वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला (आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला असल्यास)
८. आधार कार्डाची छायांकीत प्रत
९. पासबुकची छायांकीत प्रत (पासबुक केवळ विद्यार्थ्यांच्या नावे असावे. संयुक्त खाते असलेल्या पासबुकची प्रत नसावी.)
१०. ५० टक्के शिक्षण शुल्कापेक्षा उत्पन्न कमी असल्यास ज्यांच्याकडून अर्थसहाय्य घेतले त्यांचे मूळ प्रतिज्ञापत्र / शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास बॅंकेचे प्रमाणपत्र
११. स्वयं सांक्षाकन घोषणापत्र (विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केले असल्यास)
१२. केंद्रिभूत प्रवेश घेतलेल्या अलॉटमेंट लेटरची प्रत

<u>**प्रस्तावामध्ये ज्या ज्या शैक्षणिक वर्षाचे विद्यार्थी अंतर्भूत आहेत त्या सर्व शैक्षणिक वर्षाच्या शिक्षण शुल्क समितीने मंजूर केलेल्या प्रमाणित प्रती जोडणे तसेच या कार्यालयाने निर्गमित केलेले हमीपत्र व प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.**</u>

सदर प्रस्ताव संस्थेतील ईबीसी तसेच मायनॉरिटी प्रकरण हाताळणाऱ्या कर्मचाऱ्याने सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत संस्थांनी प्रस्ताव सादर करण्याची तारीख बदलून मागू नये.

**महत्त्वाची सूचना** : सर्व संबंधीत संस्थांनी ईबीसी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करतांना, प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, थेट द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष .... अशा पध्दतीने क्रमवार अर्ज लावून सर्व अर्ज फाईलमध्येच सादर करावेत. कोणत्याही परिस्थितीत ओपन फोल्डर्समध्ये अर्ज सादर करु नयेत. ओपन फोल्डर्समध्ये आणलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

PANaik

**(प्रमोद अं. नाईक)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई